स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी) : कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना येत्या सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यासंदर्भात विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना दि. २८ एप्रिल रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी मार्गदर्शन करून नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी सज्ज रहावे असे प्रतिपादन केले.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे उपस्थित होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणातील महत्वाचे टप्पे व संपूर्ण आराखडा, शासनाचे परिपत्रक या संदर्भातील माहिती कुलगुरूंनी सादर केली. नव्या धोरणानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमाचा पर्याय विद्यार्थ्यांपुढे असेल त्याला ऑनर्स पदवी म्हटले जाईल. तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम देखील कायम राहील. पहिल्यावर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस क्रेडिट गुणांकन पध्दतीनुसार अभ्यासक्रम शिकविला जाईल. प्रत्येक विषयाचे क्रेडीट निश्चित केले जाईल. शिक्षण सुरू असतांना विद्यार्थ्यांना मल्टीपल एन्ट्री आणि मल्टीपल एक्झीट काही अटींसह दिली जाईल. मात्र त्यासाठी सात वर्षांची मुदत दिली जाणार आहे इत्यादी माहिती यावेळी कुलगुरूंनी देवून आपल्या कुटूंब, परिसरातील विद्यार्थी, पालक यांना आवश्यक ते मार्गदर्शन यासंदर्भात करावे असे आवाहन केले. शिक्षकांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची रचना करावी याबाबत अभ्यासपूर्ण तयारी करावी असेही सूचीत केले. यावेळी कर्मचारी व शिक्षक यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आलीत. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन डॉ. सुनील पाटील यांनी केले. या कार्यशाळेत विद्यापीठातील प्रशाळा संचालक, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बातमी क्र. २

जळगाव दि.२९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेत मराठी विभागातर्फे संशोधन विषयावर आधारीत भित्तपत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या नवसंशोधन, नवोपक्रम व साहचर्य विभागाचे संचालक डॉ. राजेश जवळेकर होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा.म.सु.पगारे हे होते. यावेळी डॉ. जवळेकर यांनी सांगितले की संशोधनातून नवनिर्मिती होत असते. संशोधन हे विज्ञानापुरते मर्यादित नसून हे त्याची इतर क्षेत्रात आवश्यकता आहे. त्यादृष्टीने आपण संशोधनात व्यस्त असले पाहिजे. डॉ. पगारे यांनी अध्यक्षीय भाषणात संशोधनाची हाताळणी, मांडणी याबाबत माहिती देवून आयुष्यात संशोधन महत्वाचे असून ते विचारांना बळ देते असेही सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार डॉ. दीपक खरात यांनी केले. या कार्यक्रमास डॉ. सुदर्शन भवरे, प्रा. बाळासाहेब सुर्यवंशी, प्रा. योगेश शिंदे, प्रा. उज्वला लांडगे, महेश सुर्यवंशी व प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २९ एप्रिल, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी